**<u>सदर साक्ष नोंदवितांना आरोपी न्यायालयासमक्ष व्ही.सी.द्वारे हजर</u>.**

**<u>नियमित फौजदारी ख. क्र. ४०४/२०२५</u>.**
**निशाणी क्र. १४/क**
**सरकार वि. सुकदेव तडवी**

**<u>ठाणे अंमलदार</u>.**

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.०६.</u>**

मी शपथेवर कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | : | प्रेमसिंग उत्तमसिंग गिरासे |
| वय | : | ५२ वर्षे, |
| धंदा | : | नोकरी हे.कॉ. ब.नं. १०११ |
| सध्या नेम. | : | शिरपूर शहर पोलीस स्टेशन. |

**<u>सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. आर. ए. पाडवी यांचेकडून:</u>**

१. दि. ३१.१२.२०२४ रोजी मी शिरपूर शहर पोलीस स्टेशन येथे ठाणे अंमलदार म्हणून दुपारी ०१.०० ते रात्री ०८.०० वा. पर्यंत कार्यरत होतो. सदर दिवशी आशिष प्रकाश जैन, वय ४४ वर्षे रा. जुने पोस्ट ऑफीस जवळ, शिरपूर (साक्षीदार नंतरहून सांगतात की, जुन्या टेलिफोन ऑफीस जवळ) हे आले. त्यांनी आल्यानंतर असे सांगितले की, दि २७.१२.२०२४ रोजी सायंकाळी ०६.०० ते ७.४५ पर्यंत माझी हिरो कंपनीची एचएफ डिलक्स मोटारसायकल क्र. एमएच–१८–एयु–२६७७ ही गाडी शकुंतला लॉन्स समोर लॉक करुन मी माझ्या कामासाठी शकुंतला लॉन्स मध्ये गेलो होतो.

२. संध्याकाळी ७.४५ वा. बाहेर आल्यानंतर त्यांची मोटारसायकल त्यांना दिसली नाही. म्हणून त्यांनी मला सांगितले की, “माझी मोटारसायकल अज्ञात इसमाने चोरुन नेली”. त्यांनी तसे सांगितल्याप्रमाणे मी त्यांची खबर नोंदवून घेतली. त्या खबरीवर त्यांनी माझ्यासमक्ष सही केली. आता मल फिर्याद दाखवली. त्यावर माझी व फिर्यादीची सही आहे. त्यावर मी त्यावर सदर दिवशी शेरा मारलेला आहे. त्या शे–या अन्वये सदर गुन्हयाचा तपास पोहेकॉ २७१ चेतन सोनवणे यांच्याकडे दिला. सदर फिर्याद ही निशाणी क्र. पी–१/पीडब्लू–१ वर आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

POOJA NARAYAN KOKATE
Digitally signed by POOJA NARAYAN KOKATE
Date: 2026.03.17 17:20:01 +0530

३. फिर्यादीच्या अनुषंगाने मी प्रथम खबरी अहवाल नोंदविला. त्यास गुन्हा क्रमांक नोंदविला तो मला सांगता येणार नाही. सदर प्रथम खबरी अहवाल पाहिला असता, मी ओळखू शकतो. आता मला सदर प्रथम खबरी अहवाल दाखवला.त्यावर माझी व फिर्यादीची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. फिर्यादी याने माझ्या समक्ष त्यावर सही केल्याने मी फिर्यादीची त्यावरील सही ओळखतो. सदर **प्रथम खबरी अहवाल** यास **निशाणी क्र. पी–१/पीडब्लू–६** असे देण्यात येत आहे. प्रथम खबरी अहवाल हा सन २०२४ वर्षातील आहे.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एस.जे. पाटील यांच्यामार्फतः**

४. प्रथम खबरी अहवालावर त्यावेळचे तत्कालीन ठाणेदार कांतीलाल काशिनाथ पाटील यांची सही नाही. फिर्याद व प्रथम खबरी अहवाल याव्यतिरिक्त मी फक्त गुन्हयाचा तपास दिला, इतर काही केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादी जैन यांच्या म्हणण्याप्रमाणे फिर्याद नि.क्र. पी–१/पीडब्लू–१ घेतली नाही. ठाणेदार कांतीलाल पाटील यांनी प्रस्तुत घटनेचा तपास पोहेकॉ चेतन सोनवणे यांना देणेकामी मल कुठलाही लेखी आदेश दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

POOJA NARAYAN KOKATE

Digitally signed by POOJA NARAYAN KOKATE
Date: 2026.03.17 17:20:05 +0530

शिरपूर.
दिनांक १७.०३.२०२६.

(श्रीमती पूजा ना. कोकाटे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्यायालय क्र.१),
शिरपूर, जि. धुळे.
**JO Code-2489**